दै. देशोन्नती दि. 07-12-23

# नांदेड व कंधारमधील घरफोडीचे गुन्हे उघडकीस

त्ती वृत्तसंकलन...

**»स्थानिक गुन्हे शाखा, शिवाजीनगर डीबी पथकाची कारवाई » ४२ लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त**





नांदेड ■ स्थानिक गुन्हे शाखा व ...नगर डीबी पथकाने प्रत्येकी एक ...चे गुन्हे उघड करून एकूण ४२ लाख ...जार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त ... माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण ...यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. ...धार येथील रहिवासी मोहम्मद युसुफ ... हैद्राबाद येथे रुग्णालयात गेले होते. ... नसल्याची संधी साधून चोरट्यांनी ...कडीकोंडा तोडुन बेडरुममध्ये ठेवलले ... ५० हजार रुपये लंपास केले होते. ... कंधार पोलिसांनी गुन्हा दाखल केला

...न स्थानिक गुन्हे शाखेला यातील ...ीन महेबुब जानी शेख हा यातील ... घरी नेहमी ये - जा करीत होता. ...च सदरची चोरी केली असल्याचा ...ने त्यास ताब्यात घेवुन विचारपुस ... त्याने बेडरुमचे कुलुप तोडुन ...ेली रोख रक्कम २७ लाख ५० ... चोरल्याची कबुली दिली. सदर रक्कम त्याचे ताब्यातुन जप्त केली आहे. सदर आरोपी व मुद्देमाल कंधार पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. या कारवाईत उपविभागीय पोलिस अधिकारी थोरात यांच्या मार्गदशनाखाली स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय, सपोनि पांडुरंग माने, पोउपनि सचीन सोनवणे, पोलीस अंमलदार संजय केंद्रे, गंगाधर कदम, गुंडेराव करले, देवा चव्हाण आदींचा समावेश होता. तर दुसऱ्या कारवाईत १९ नोव्हेंबर रोजी वसंतनगर येथील रहिवासी राहत्या घराच्या दरवाज्यांना कुलुपकोंडा लावुन संपुर्ण परिवारासह तिरुपती येथे देवदर्शनासाठी गेले होते. यावेळी घरी कोणी नसल्याची संधी साधून चोरट्याने कुलुप कोंडा तोडुन घरात प्रवेश करुन घरामधील लाकडी पलंगामध्ये ठेवलेले १६ लाख २८ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेले. यावेळी शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता एक इसम २० नोव्हेंबर रोजी मध्यरात्री १.३० वाजताच्या सुमारास सदर घराच्या दिशेने जात असताना व घरासमोरील दरवाजासमोर फिरताना दिसला. त्यावरुन इतर आजुबाजुचे कॅमेरे तपासले असता त्याच प्रकारचा पेहराव असलेला इसम रेंजर सायकलीवर समोर हँडलला दोन पिशव्या लटकावुन जात असताना दिसला. दरम्यान गोपनीय माहितीच्या आधारे गुन्ह्यातील आरोपी राजु गायकवाड (३४) रा. मेहबुबनगर, नांदेड यास ताब्यात घेवुन सखोल चौकशी करुन गुन्ह्यातील गेलेल्या मालाबाबत विचारपुस केली असता आरोपीने गुन्हा केल्याचे कबुल करुन त्याच्या ताब्यातुन गुन्ह्यातील माल सोन्याचे पाटल्या, बांगड्या, तोडे, नेकलेस, मिनीगंठण, बिनले, गळयातील साखळी, ओम चैन, तिन अंगठ्या, मंगळसुत्र, कर्नफुल असा एकुण १५ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिणे व चांदीचे घुंगराचे पैंजन, रेंजर सायकल असा एकुण १५ लाख १० हजार रुपये किंमतीचे दागिने जप्त केले. या कारवाई पथकात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि मोहन भोसले व गुन्हे शोध पथकप्रमुख पोउपनि मिलींद सोनकांबळे, पोहेकॉ रविशंकर बामणे, देवसिंग सिंगल, शेख अझहर, लिंबाजी राठोड, अंकुश लंगोटे, दत्ता वडजे, बाळकृष्ण मुरकुटे यांचा समावेश होता.

# ...वयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीस ७ दिवसांची पोलीस कोठडी

...त्तसंकलन...

■ शहरातील गोकुळनगर भागात राहणाऱ्या ... मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला ... दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे, ... मारहाण करणाऱ्या मुलीच्या नातेवाईकांच्या ...टीअंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक ... आहे.

... रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास ...त राहणाऱ्या देविदास रामा गवलवाड (२२) ...ळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन ...रून जबरीने अत्यांचार केला. या कृत्यासाठी त्याचा ट्रॅक्टरमालक ज्ञानेश्वर उल्लेवार (३०) याने सहकार्य केले. ३ डिसेंबर रोजी पीडित मुलीने आपल्या नातेवाईकांना सदर घटना सांगितली. त्यामुळे मुलीचे वडील, दोन चुलते व एका नातेवाईकाने आरोपी युवकास शहराच्या दक्षिणेकडील भक्तापूरच्या माळावर नेऊन बेदम मारहाण केली. ४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.४५ वाजताच्या सुमारास पीडित मुलीच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरून देगलूर पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध पोक्सो कलम ३७६(३), ३५४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करून आरोपी देविदास गवलवाड यास अटक करण्यात आली. आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला ११ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान या गुन्ह्यातील सहआरोपी ट्रॅक्टरमालक ज्ञानेश्वर उल्लेवार हा फरार झाला आहे. अत्याचार करणाऱ्या आरोपीविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यापूर्वीच त्याला जबर मारहाण करून जातीवाचक शिविगाळ केल्याप्रकरणी ५ व ६ डिसेंबरच्या मध्यरात्रीनंतर पीडित अल्पवयीन मुलीचे वडील, दोन चुलते व एका नातेवाईकाविरुद्ध अॅट्रॉसिटीअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील चार आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर देशमुख, पोलीस निरीक्षक संजय हिबारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल घोंगडे करीत आहेत. (श.प्र.)